FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नवापूर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0724 **Year (वर्ष):** 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ): 09/10/2026 12:06

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिंनाक पासून):** 08/10/2026
Time Period (कालावधी): **Date To (दिंनाक पर्यंत):** 09/10/2026
Time From (वेळेपासून): 19:47 बजे
Time To (वेळेपर्यंत): 10:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिंनाक): 09/10/2026 **Time (वेळ):** 11:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 009
Date & Time (दिंनाक आणि वेळ): 09/10/2026 11:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 05 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** धुळे सुरत हायवे रोडवरील ,उर्विशा हॉटेलच्या पार्किंग , मध्ये नवापुर,नवापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पो.नि.योगेश भास्कर शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	नेमणुक ला प्र नाशिक ,नाशिक ,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	नेमणुक ला प्र नाशिक ,नाशिक ,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9403865681

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	संदीप देवराम पाटील			1. अविनाश अपार्टमेन्ट, साने गुरजी कॉलनी जळगाव ,जळगाव , जळगाव,महाराष्ट्र,भारत
2	विवेक विश्वनाथ घोडके			1. गुरुकृपा विमल विहार कॉलनी , नंदुरबार ,नंदुरबार ,नवापूर, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

Scanned with OKEN Scanner

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	जप्त लाचेची रक्कम50,000/ रुपये (पंन्नास हजार रुपये)	50,000.00

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

फिंयाद दिंनाकः- 09/10/2026

माझे नांव श्री. योगेश भास्कर शिंदे, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नाशिक मोबाईल नंबर 9403865681
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन सरकार तर्फे फिंयाद देतो की, मी पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असुन दिंनाक 13/06/2026 रोजी पासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नाशिक परिक्षेत्र कार्यालय नाशिक येथे नेमणुकीस आहे.

दिंनाक 08/10/2026 रोजी आम्हास वाचक पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.नाशिक यांनी तक्रारदार नामे किशन मेहता यांचा संपर्क क्रमांक देऊन त्यांचेकडे लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याचे सांगुन शाकीय पंच उपलब्ध करुन तक्रारदाराचे तक्रारी प्रमाणे कारवाई करणेबाबत आदेशित केले. त्यावरुन आम्ही मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना पत्र देऊन पंच नामे 1) श्री. दिलीप टोपे 2) श्री. प्रकाश जाधव यांना उपलब्ध केले. त्यानंतर आम्ही, सापळा पथक पोहवा/निंबाळकर, पोहवा/नेटारे व शासकीय पंच असे खाजगी वाहनाने तक्रारदारास संपर्क करुन लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई करीता लागणाऱ्या सर्व साहित्यासह तक्रारदाराचे सांगण्याप्रमाणे नवापुर जि. नंदुरबार याठिकाणी सुरत धुळे हायवे लगत तक्रारदार यांचेसोबत झालेल्या संपर्कानुसार त्यांचे सन शाईन कार केअर याठिकाणी बोलाविले त्याप्रमाणे आम्ही सापळा पथकासह सदर ठिकाणी 16.35 वाजता हजर आलो. त्यावेळी तक्रारदार प्रत्यक्ष हजर होते. त्यावेळी पंचासमक्ष तक्रारदार यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. किशन अजय मेहता, वय- 33 वर्ष, व्यवसाय- मेहता टेडर्स फर्म, राहणारः- दत्त मंदिर जवळ, शिवाजी रोड, नवापुर, ता. नवापुर, जि. नंदुरबार असे सांगितले. त्यावेळी आम्ही आमची, सापळा पथक, पंच व तक्रारदार यांची आपसात ओळख करुन घेतली त्यानंतर तक्रारदारास त्यांची तक्रार विचारली त्यांचे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखित केली ती पुढील प्रमाणे

'' माझे मेहता ट्रेडर्स फर्म नावाचे स्टिल व सिमेंट विक्रीचे दुकान असुन ते मेहता ट्रेडर्स या नावाने सन 2017 या वर्षी नोंदणी झालेले आहे. त्याचा जीएसटी नंबर 27BQSPM0826M1Z8असा असुन मी, आजतागायत प्रत्येक आर्थिक वर्षातील जीएसटी भरलेला आहे.

मला राज्य कर अधिकारी, वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार यांचेकडुन दिंनाक 06/08/2026 रोजीची नोटीस ऑनलाईन प्राप्त झाली असुन त्यात सन 2022-2023 या वर्षातील 9,79,665 /- रूपये व्याज व दंडासह जीएसटी भरणा केलेला नाही असे नमुद आहे. त्यानंतर मला पुन्हा दिंनाक 13/08/2026 रोजीची नोटीस ऑनलाईन प्राप्त झाली असुन त्यात सन 2022-2023 या वर्षातील 21,52,401/- रूपये व्याज व दंडासह जीएसटी भरणा केलेला नाही असे नमुद आहे. सदर दोन्हीही नोटीस बाबत माझे चार्टड अकाऊंटंट हे वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार येथे जाऊन त्यांनी खात्री केली असता सदर आर्थिक वर्षात जीएसटी पडताळणी दरम्यान तफावत आढळुन आल्याने त्यांनी सदर नोटीसा दिल्याचे सांगितले. त्यामुळे मी, माझ्या चार्टड अकाऊंटंट मार्फत सदर दोन्हीही नोटीसांचे उत्तर वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार येथे सादर केलेले आहे.
त्यानंतर मला दिंनाक 11/09/2026 रोजीची वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार यांची सन 2022-2023 या वर्षातील वार्षिक कर विवरण पत्र न भरल्याने कारणे दाखवा नोटीस कुरीयरने प्राप्त झाली आहे. त्यानंतर मला पुन्हा

Scanned with OKEN Scanner

दिनाक 23/09/2026 रोजीची वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार यांची सन 2023-2024 या वर्षातील वार्षिक कर विवरण पत्र न भरल्याने कारणे दाखवा नोटीस कुरीयरने प्राप्त झाली आहे.
मी, दिंनाक 06/08/2026 व दिंनाक 13/08/2026 रोजीच्या नोटीसांना माझ्या चार्टड अकाऊंटंट मार्फत सदर दोन्हीही नोटीसांचे उत्तर वस्तु व सेवा कार्यालय, नंदुरबार येथे सादर केलेले असतांना देखील तेथील श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी व त्यांचे सहकारी श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक यांनी सदर नोटीसा निकाली काढल्या नाही.
आज दिंनाक 08/10/2026 रोजी सकाळी 11ः00 वाजताचे सुमारास श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक यांचा माझे मोबाईलचे व्हाॅटस्अँपवर मिस काॅल पडलेला दिसला, त्यामुळे मी, त्यांना व्हाॅटस्अँपवर काॅल केला असता त्यांनी मला सांगितले की, आज रोजी ते व त्यांचे सहकारी श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी असे नवापुर येथे येणार असल्याचे त्यांनी कळविले. म्हणुन मी त्यांना माझ्या वरील नोटीसा निकाली काढण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरच्या नोटीसा निकाली काढण्याचे मोबादल्यात व सन 2022-2023 तसेच सन 2023-2024 या वर्षातील वार्षिक कर विवरण पत्र न भरल्याने काढलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये मदत करण्याचे मोबदल्यात माझ्याकडे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे आता एवढे पैसे नाही असे सांगितले असता आम्ही नवापुर येथे आल्यावर बोलु असे त्यांनी मला सांगितले.
आज दिंनाक 08/10/2026 रोजी मी, श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी यांना नवापुर येथे भेटणार असुन त्यावेळी ते माझ्याकडे लाचेची मागणी करतील व मी त्यांना लाच न दिल्यास ते माझ्या वरील नोटीसा निकाली काढणार नाही व सन 2022-2023 तसेच सन 2023-2024 या वर्षातील वार्षिक कर विवरण पत्र न भरल्याने काढलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये मदत करणार नाही. मला, श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझ्यात आणि श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार नसुन कोणतेही वैर नाही. तरी सदर बाबत पडताळणी करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेस विंनती आहे. मला मराठी वाचता येते परंतु मराठी लिहीता येत नसल्याने माझी वरील तक्रार मी सांगितल्याप्रमाणे लॅपटाॅपवर मराठीत टंकलिखित केली आहे.'' अशी तक्रार सांगुन त्यांना मराठी वाचता येते परंतु लिहता येत नसल्याने त्यांचे विंनती वरुन ती आम्ही लॅपटाॅपवर टंकलिखित करुन प्रिंट काढली, त्यावर आम्ही, पंच व तक्रारदार यांनी वाचुन सहया केल्या आहेत.
तक्रारदार श्री. किशन मेहता यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार हे तक्रारदार यांचेकडे खरोखर लाचेची मागणी करतात काय ? याची पडताळणी करणे साठी तक्रारदार यांना श्री. पाटील व श्री. घोडके यांची नेमकी भेट कोठे होईल याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, मला थोडावेळापुर्वी श्री. घोडके यांनी व्हाॅट्सअपवर काॅल करुन स्वस्तीक हाॅटेल, धुळे सुरत हायवे लगत नवापुर येथे बोलाविले असल्याचे सांगितले. तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पडताळणी करण्यासाठी पंच क्रमांक 1 श्री. दिलीप टोपे यांचेसोबत पाठविण्याचे ठरले असता त्यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 यांना श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार यांची भेट घेण्यासाठी रवाना करण्यापुर्वी आम्ही दोन्ही पंचासमक्ष सिंलबद असलेले पाकिटातील नविन मेमरी कार्ड काढुन व्हाईस
रेकाॅ
ड
र मध्ये टाकुन चालू केले व एका काळया रंगाचे पाऊचमध्ये ठेवुन ते तक्रारदाराचे शर्टाचे आत असलेल्या बनियानच्या आतील सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार व पंच क्रमांक. 1 हे 19/10 वाजता परत आले. त्यावेळी तक्रारदाराकडील व्हाईस
रेकाॅ
ड
र ताब्यात घेऊन बंद केले. त्यानंतर पंच क्रमांक. 1 यांना व तक्रारदार यास श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. सं
दिंनाक 08/10/2026 रोजी श्री. विवेक घोडके, राज्य कर निरीक्षक व श्री. संदिप पाटील, राज्य कर अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार यांनी लाच मागणी केलेले 50,000/- रुपये घेऊन तक्रारदारास धुळे सुरत हायवे वरील हाॅटेल उर्वीशा, नवापुर येथे बोलाविले असल्याने आम्ही तक्रारदार यांना मागणी केलेली लाचेची रक्कम 50,000/- रुपये हजर करण्यास सांगितले असता त्यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम हजर केली. सदर लाचेच्या रक्कमेतील नोटांचे नंबर एका कागदावर नोंद केले. त्यानंतर कृत्रिम अंधार करुन पोलीस हवालदार निंबाळकर यांनी

Scanned with OKEN Scanner

अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्यांचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर लाच रक्कमेस अॅन्थ्रासिन पावडर लावुन ती पंचासमक्ष तक्रारदार यांचे पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेऊन दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 यांना सापळा कारवाईच्या सर्व योग्य त्या सुचना देऊन लाच रक्कम स्विकारल्यास डावे खिशातील रुमाल डावे हाताने काढुन तोंडावर फिरवण्याचा इशारा करण्यास सांगितले. व्हाईस
रेका ॅ
ड
र मध्ये सिलबद पाकिटातील नविन मेमरीकार्ड टाकुन चालू करुन ते एका पाऊच मध्ये टाकुन तक्रारदाराचे शर्टाच्या आत बानि
तरी यातील तक्रारदार श्री. किशन अजय मेहता यांचे मेहता ट्रेडर्स फर्मचे सन 2022-2023 व सन 2023-2024 चे आर्थिक वर्षातील जीएसटी कर नियमित भरलेला असतांना देखील त्यांना दिंनाक 06/08/2026 रोजी व दिंनाक 13/08/2026 रोजी सन 2022-2023 मधील आर्थिक वर्षात जीएसटी पडताळणी दरम्यान तफावत आढळुन आल्याने दंडाच्या नोटीसा प्राप्त झाल्या होत्या. त्याबाबत तक्रारदार श्री. मेहता यांनी त्यांचे चार्टड अकांउटंट यांचे मार्फत लेखी उत्तर वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार यांना सादर केले होते. तसेच दिंनाक 11/09/2026 रोजी सन 2022-2023 व दिंनाक 23/09/2026 रोजी सन 2023-2024 या आर्थिक वर्षातील वार्षिक कर विवरण पत्र न भरल्याबाबतच्या कारणे दाखवा नोटीसा प्राप्त झाल्या होत्या. सदर दंडाच्या नोटीसा निकाली काढण्याचे मोबदल्यात व वार्षिक विवरण कर पत्र न भरल्याबाबतच्या काढलेल्या कारणे दाखवा नोटीस मध्ये मदत करण्याचे मोबदल्यात दिंनाक 08/10/2026 रोजी 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती दोन्ही लोकसेवक यांनी तक्रारदाराकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच स्विकारण्याची तयारी दर्शविली. दिंनाक 08/10/2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान दोन्ही लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम घेऊन तक्रारदार यास धुळे सुरत हायवे वरील हा ॅटेल उर्विशा, नवापुर येथील हा ॅटेलचे पार्किंग मध्ये बोलावुन लोकसेवक श्री. पाटील यांचे उपस्थितीत व संमतीने लोकसेवक श्री. विवेक घोडके यांनी तक्रारदारा कडुन 50,000/- रुपये लाचेची रक्कम 19/47 वाजता स्विकारली म्हणुन माझी सरकार तर्फे 1) लोकसेवक नामे संदिप देवराम पाटील, वय- 45 वर्शे, पद- राज्य कर अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार, सध्या राहणारः- इंदिरा संकुलच्या पाठिमागे, सरगम का ॅलनी, कोरीट रोड, नंदुरबार, मुळ राहणार- फलॅट नंबर 502, अवनिष अपार्टमेंट, साने गुरुजी का ॅलनी, जळगांव 2) लोकसेवक नामे विवेक विश्वनाथ घोडके, वय- 37 वर्शे, पद- राज्य कर निरीक्षक, वस्तु व सेवा कर कार्यालय, नंदुरबार, राहणारः- प्ला ॅट नंबर 75, गुरुकृपा विमल विहार का ॅलनी, नंदुरबार यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली असता ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Abhishek Dilip Patil (I (Inspector)) / 151010000402ADPM8401U **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)
Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Abhishek Dilip Patil
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 15101000402ADPM840

(योगेश भास्कर शिंदे)
पोलीस निरीक्षक

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant:**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

सत्यमेव जयते

Scanned with OKEN Scanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO
2	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with OKEN Scanner